# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## नियोजन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

बैठक क्रमांक : 44

स्थळ : **प्रशासकीय इमारत विद्यापीठ सभागृह (Offline/Online)**

दिनांक : शनिवार, 10 जून, 2023

वेळ : दुपारी 12 : 00 वाजता

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: ४८/2589
दि. 22/ 6 /2023

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## कार्यवृत्त

44 वी नियोजन मंडळ बैठक, शनिवार, दिनांक 10 जून 2023 रोजी दुपारी 12.00 वाजता, विद्यापीठातील सभागृहात **ऑनलाईन व ऑफलाईन** पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू — अध्यक्ष
2. डॉ. जयदीप निकम — सदस्य
3. डॉ.राम ठाकर — सदस्य
4. डॉ. मनोहर पाटील — सदस्य
5. डॉ. संजय बी. चोरडिया — सदस्य (ऑनलाईन)
6. डॉ. अरविंद चौधरी — सदस्य (ऑनलाईन)
7. मा.भटूप्रसाद पाटील, कुलसचिव (प्र.) — सदस्य सचिव

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

8. मा.आ. श्री.सुहास कांदे — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 44.1.0 | | **नवनियुक्त कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनवणे यांचे स्वागत**<br>नियोजन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी नवनियुक्त कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनवणे यांचे स्वागत केले. |
| 44..2.0 | 44.2.1 | दि. 16 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 43 व्या नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br>**नियोजन मंडळ ठराव :** दि. 16 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 43 व्या नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. |
| | 44..2.2 | दि. 16 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 43 व्या नियोजन मंडळ बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.<br>**नियोजन मंडळ ठराव :** दि. 16 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 43 व्या नियोजन मंडळ बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 44.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 44.3.1<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **प्रा. राम ताकवले रिसर्च अँड डेव्हलपमेंट केंद्र स्थापन करणे बाबत**<br>(**टिपणी** - विद्यापीठातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि संशोधक विद्यार्थी यांचा संशोधनाकडे कल वाढावा आणि त्यांच्यामध्ये संशोधक वृत्ती निर्माण व्हावी यासाठी रिसर्च अँड डेव्हलपमेंट केंद्र सुरू करण्यात यावे. या रिसर्च अँड डेव्हलपमेंट केंद्राला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले यांचे नाव असावे असे प्रस्तावित आहे. याबाबत चर्चा व मान्यतेसाठी सदर विषय सादर करण्यात येत आहे. तरी “प्रा. राम ताकवले रिसर्च अँड डेव्हलपमेंट केंद्र (RT-RDC)” स्थापन करण्यास मान्यता मिळावी यासाठी प्रस्ताव सादर.)<br>**नियोजन मंडळ ठराव :** “प्रा. राम ताकवले रिसर्च अँड डेव्हलपमेंट केंद्र (RT-RDC” हे केंद्र स्थापन करण्याची मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली व सदर शिफारस व्यवस्थापन मंडळापुढे सादर करावी असे सर्वानुमते ठरले. |

<table>
<tr>
<td></td>
<td>44.3.2<br>अंतर्गत<br>गुणवत्ता<br>आश्वासन<br>केंद्र</td>
<td>विद्यापीठात Yash Centre for Innovation & Incubation and Linkages(YCIIL) स्थापन करण्याबाबत<br>(टिपणी - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पूर्ण महाराष्ट्र राज्य असून विद्यापीठात वेगवेगळ्या स्तरातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्यामुळे समाजातील विविध लोकांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाबींचा अभ्यास प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष प्रकारे होत असतो. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करता तसेच नव्याने विकसित होत असेलेल तंत्रज्ञानातील कल्पनांना चालना मिळावी आणि शासनाच्या स्टार्टअप (Startup) योजनेत सहभागी होता यावे आणि होतकरू व हुशार विद्यार्थी व समाजातील इतर घटकांना संशोधनाच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देणे आणि योग्य त्या कल्पनांना स्टार्टअप (Startup) मध्ये संधी उपलब्ध करून देणेबाबत विद्यापीठाकडे स्वत:चे Centre for Innovation, & Incubation and Linkages असावे असे वाटते. त्यामुळे Yash Centre for Innovation, & Incubation and Linkages (YCIIL) चा प्रस्ताव सादर.)<br>नियोजन मंडळ ठराव : शासनाच्या स्टार्टअप योजनेत सहभागी होता यावे आणि विद्यार्थी व समाजातील इतर घटकांच्या संशोधन कल्पनांना मूर्त स्वरूप देऊन त्यांना स्टार्टअप मध्ये संधी उपलब्ध करून देण्याकरिता Yash Centre for Innovation, & Incubation and Linkages (YCIIL) हे केंद्र स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली व सदर शिफारस व्यवस्थापन मंडळापुढे सादर करावी असे सर्वानुमते ठरले.</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>44.3.3<br>अंतर्गत<br>गुणवत्ता<br>आश्वासन<br>केंद्र</td>
<td>प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस / सिनिअर अकेडमिक कन्सल्टंट / व्यवस्थापकीय संचालक / संचालक पद निर्मिती व भरती प्रक्रिया मान्यता मिळणेबाबत<br>(टिपणी - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी वेळोवेळी विद्यापीठास सर्वांगीण विकासासाठी समाजातील तज्ञ लोकांचा अनुभव व कुशलतेचा फायदा करून घेण्यासाठी प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस सारख्या पदाची निर्मिती करावी अशी अपेक्षा केली आहे. या अनुषंगाने आणि मा. कुलगुरू यांनी विविध विद्याशाखांना भेटी दिल्या. त्यातील चर्चेच्या दरम्यान अशा पदांची विद्यापीठात गरज असल्याचे निदर्शनासआले आहे. त्यामुळे खालील तक्त्यातील करारावरील पद निर्मिती करण्यात यावी व त्यानंतर पद भरती करण्यास मान्यता मिळावी, यासाठी प्रस्ताव सादर.)
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>क्षेत्राचे नाव</th><th>पद संख्या</th></tr>
<tr><td>01</td><td>Research, Patent and IPR</td><td>01</td></tr>
<tr><td>02</td><td>Agro Tourism and Extension</td><td>01</td></tr>
<tr><td>03</td><td>Online Learning</td><td>01</td></tr>
<tr><td>04</td><td>Innovation, Incubation and Start up</td><td>01</td></tr>
</table>
नियोजन मंडळ ठराव : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020 आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी वेळोवेळी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील तज्ञ लोकांचा अनुभव व कुशलतेचा फायदा करून घेण्यासाठी Research, Patent and IPR , Agro Tourism and Extension, Online Learning, Innovation, Incubation and Start up या क्षेत्रातील प्रत्येकी एक प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस सारख्या पदांची निर्मिती करण्याची शिफारस करण्यात आली तसेच या पदांचे मानधन निश्चित करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यास व सदर शिफारस व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>44.3.4<br>अंतर्गत<br>गुणवत्ता<br>आश्वासन<br>केंद्र</td>
<td>4. शैक्षणिक वर्ष 2023-24 साठी सुधारित शिक्षणक्रम शुल्कास मान्यता मिळण्याबाबत<br>(टिपणी - दिनांक 07 मार्च 2023 रोजी मा. कुलगुरू यांनी सुचित केल्याप्रमाणे सर्व विद्याशाखांनी शिक्षणक्रम शुल्क निश्चित केलेले आहे. सदर शिक्षणक्रम शुल्क शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून लागू करण्याबाबत चा प्रस्ताव नियोजन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.)<br>नियोजन मंडळ ठराव : शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून सर्व विद्याशाखांनी सुधारित शिक्षणक्रम शुल्क प्रस्तावित केले आहे. त्यावर नविन शैक्षणिक धोरण व त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना विविध योजना उपलब्ध करून देणे तसेच अध्ययन साहित्य निर्मीती करावी लागणार असल्याने विद्यापीठास आर्थिक भार सहन कारावा लागणार असल्याने सदरचा विषय वित्त समितीत सादर करण्याची शिफारस करण्यात आली. तसेच यासंदर्भात वेळोवेळी निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | 44.3.5<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **शैक्षणिक समन्वयक पदनामात बदल करून ते शैक्षणिक समन्वयक (सहायक प्राध्यापक ग्रेड) असे करणे आणि सहायक प्राध्यापक पदाचा बेसीक पे लागू करणेबाबत...**<br>**(टिपणी** - विद्यापीठ अनुदान आयोगाकडे शिक्षणक्रम मान्यतेसाठी पाठविताना शैक्षणिक संयोजक या पदनामाचा ODL Regulation 2000 मध्ये उल्लेख नसल्याने अर्ज करताना अडचणी उद्धवतात, तसेच त्यांचे नेमणूक आदेश सादर करावे लागतात. त्यात शैक्षणिक संयोजक असे पदनाम दिल्याने विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) कडून अडचणी निर्माण होतात. त्यामुळे या पदनामात बदल करणे आवश्यक असल्याने हे पदनाम शैक्षणिक समन्वयक (सहायक प्राध्यापक ग्रेड) असे करण्यात यावे. तसेच सहायक प्राध्यापक पदाचा बेसिक पे देखील लागू करण्यात यावा. त्यामध्ये दरवर्षी 3 टक्के वेतन वाढ लागू करण्यात यावी. तसेच नेमणूक आदेश देताना सहा महिने कालावधी न देता किमान 11 महिन्यांची नेमणूक आदेश देण्यात यावा. सदर प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर.)<br>**नियोजन मंडळ ठराव :** शैक्षणिक संयोजक पदनामात बदल करून ते शैक्षणिक समन्वयक (सहायक प्राध्यापक ग्रेड) असे करणे आणि सहायक प्राध्यापक पदाचा बेसीक पे लागू करणे व 11 महिन्यांचा नेमणूक आदेश देतांना विद्यापीठ अध्यादेश व परिनियमांचा आधार घेऊन शिफारस करण्यात आली व सदरची शिफारस व्यवस्थापन मंडळापुढे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 44.3.6<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **संचालक पदासाठी रोटेशन पद्धत लागू करणेबाबत**<br>**(टिपणी** - विद्यापीठातील शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाज विविध विद्याशाखा, विभाग आणि केंद्र यांच्यामार्फत चालते. सदर विद्याशाखा, विभाग आणि केंद्र यांच्या संचालक / प्रमुख पदाची जबाबदारी त्या विभागातील सर्वात ज्येष्ठ प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक यांच्याकडे म्हणून येते. सध्या प्रचलित संकेतानुसार संचालक पदावरील व्यक्ती जो पर्यंत सेवानिवृत्त होत नाही किंवा ते राजीनामा देत नाहीत तो पर्यंत ते संचालक पदावर कार्यरत असतात. Career Advancement Scheme (CAS) द्वारे पदोन्नती मिळाल्याने अनेक ठिकाणी प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक याच्या सख्येत वाढ झाली आहे. तेव्हा विद्यापीठात सरळ सेवेन रुजू होणाऱ्या प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक यांना पात्र असूनही विद्यमान संचालक निवृत्त होत नाहीत तो पर्यंत संचालकपदाची संधी मिळत नाही. पर्यायाने विद्याशाखा / विभाग / केंद्र याठिकाणी नवकल्पना, नवनिर्मिती, संशोधन आणि विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी पाहिजे तसे पोषक वातावरण सदैव राहत नाही. भारतातील नामांकित संस्था जसे आय.आय.टी, आय. आय. एम. व इतर नामांकित विद्यापीठात शैक्षणिक, प्रशासकीय व संशोधनास चालना मिळावी म्हणून संचालक हे पद दर तीन वर्षांनी रोटेशन पद्धतीने बदलण्यात येते. याच धर्तीवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील संचालक पदासाठी देखील रोटेशन पध्दत लागू करण्यात यावी म्हणून खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.<br>(i) विद्यापीठातील विद्याशाखा/विभाग व केंद्र यातील संचालक पदांसाठी रोटेशन पद्धत लागू करण्यात यावी.<br>(ii) विद्यापीठातील विद्याशाखा/विभाग व केंद्रातील संचालक पद दर तीन वर्षानी त्याच विभागातील पात्र प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांच्यामध्ये त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार आळीपाळीने बदलण्यात यावे.<br>(iii) सहयोगी प्राध्यापकाकडे संचालक पद प्रभारी संचालक म्हणून न देता नियमित संचालक म्हणून देण्यात यावे.<br>वरीलप्रमाणे सदर प्रस्तावातील मुद्दा क्रमांक (i) ते (iii) मान्यतेसाठी सादर. तसेच प्रस्ताव मान्य झाल्यास सदर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळांच्या बैठकीत ठेवण्यासाठी सादर ... )<br>**नियोजन मंडळ ठराव :**<br>i. विद्यापीठातील विद्याशाखा/विभाग व केंद्र यातील संचालक पदांसाठी रोटेशन पद्धत लागू करण्यात यावी.<br>ii. विद्यापीठातील विद्याशाखा/विभाग व केंद्रातील संचालक पद दर तीन वर्षानी त्याच विभागातील पात्र प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांच्यामध्ये त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार आळीपाळीने बदलण्यात यावे.<br>**iii.** सहयोगी प्राध्यापकाकडे संचालक पद प्रभारी संचालक म्हणून न देता नियमित संचालक म्हणून देण्यात यावे. या तीनही प्रस्तावित मुद्दांना मान्यतेची शिफारस व सदरच्या शिफारशी व्यवस्थापन मंडळापुढे सादर करण्यास मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 44.3.7<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **विद्याशाखा सादरीकरणावर आधारित इतिवृत्तास मान्यता मिळण्याबाबत....**<br>(**टिपणी** - विद्याशाखा संचालकांनी मा. कुलगुरू यांच्यासमोर दिनांक 29 व 30 मे रोजी सादरीकरण केले होते. नियोजन अधिकारी यांनी त्यावर आधारित अहवाल तयार केला आहे. त्यास मा. कुलगुरू यांनी मान्यता दिली आहे. सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर... )<br>**नियोजन मंडळ ठराव** : विद्याशाखा संचालकांनी दिनांक 29 व 30 मे रोजी केलेल्या सादरीकरणावर आधारित नियोजन अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. कुलगुरू यांनी सर्व विद्याशाखा संचालकांना भविष्यात गरजेचे असलेले विविध शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यात प्रामुख्याने खालील शिक्षणक्रमाचा समावेश करण्याबाबत सुचविले होते.<br>MA on Chatrapati Shivaji Maharaj<br>MA on Jyotirao Phule : Thoughts and Practices<br>Certificate program in Seed Production<br>Certificate program in Farm Management<br>Certificate program on Millets<br>Certificate program on Hydroponics<br>Certificate program on Dog Husbandry<br>Certificate program on Farm Equipments : Maintenance and Management (with special reference to Power Tillers)<br>Certificate program on Kitchen Garden<br>The School to develop at least five online courses by December 2023 to be offered through SWAYAM MOOC platform.<br>तसेच मा. कुलगुरू यांनी खालील बाबतीत मार्गदर्शन केले आणि भविष्यात विद्यापीठात काही नाविन्यपूर्ण प्रकल्प सुरू करण्याबाबत सूचित केले आहे. त्यात प्रामुख्याने देशी श्वान संशोधन व संवर्धन केंद्र विद्यापीठात स्थापन करणे, e-Yashwarta सुरू करणे, Centre for Translation सुरू करणे, Virtual Language Lab, Virtual Science Lab इत्यादी.<br>नियोजन मंडळातील सदस्यांनी या अहवालातील उपर्युक्त मुद्यांसह इतर सर्व मुद्यांना मान्यता दिली व सदर प्रस्ताव पुढे विद्वत परिषदेसमोर चर्चा व मान्यतेसाठी सादर करण्याचे सर्वानुमते ठरले. |
| | 44.3.8<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **Academic Calendar ला मान्यता मिळणे बाबत**<br>(**टिपणी** - विविध विद्याशाखांनी शैक्षणिक वर्ष 2023 24 यावर्षीचे अकॅडमिक कॅलेंडर तयार करून सादर केले आहे. त्यास मान्यता मिळावी म्हणून सादर करण्यात येत आहे.)<br>**नियोजन मंडळ ठराव** : शैक्षणिक वर्ष 2023 24 साठी विविध विद्याशाखांनी सादर केलेल्या अकॅडमिक कॅलेंडर ला सर्वानुमते मान्यता देण्यात आली व सदर प्रस्ताव विद्वत परिषदेत मान्यतेस्तव सादर करण्याचे सर्वानुमते ठरले. |
| | 44.3.9<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **बंद करण्यात आलेल्या ज्युनिअर महाविद्यालयांना पर्यायी व्यवस्था म्हणुन त्यांना विद्यापीठाची फॅसिलिटी सेंटर्स म्हणून मान्यता देण्याबाबत व त्याबाबत कार्यपद्धती निश्चितसाठी समिती स्थापन करणे.**<br>(**टिपणी** - विद्यापीठ अनुदान आयोगाने कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यास केंद्र बंद करण्यास सांगितले आहे.त्यामुळे 385 अभ्यास केंद्र बंद करण्यात आले आहेत.याचा परिणाम विद्यार्थी संख्येवर होऊ शकतो. म्हणून अशा महाविद्यालयांना अभ्यास केंद्र न म्हणता फॅसिलिटी सेंटर म्हणून आपण मान्यता देऊ शकतो का यावर अभ्यास करण्यासाठी एक समितीची स्थापना करण्यात यावी. समिती स्थापन करण्यास मान्यता मिळावी यासाठी प्रस्ताव सादर)<br>**नियोजन मंडळ ठराव** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार 385 कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासकेंद्र बंद करण्यात आली आहेत अशा कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यापीठाचे फॅसिलिटी सेंटर म्हणून देण्याबाबत एक अभ्यास समितीची स्थापना करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व सदर ठराव विद्वत परिषदेत मान्यतेस्तव सादर करण्याचे सर्वानुमते ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 44.3.10<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणक्रम राबविणेबाबत...**<br>**(टिपणी** - महाराष्ट्र शासनाच्या सुकाणू समितीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून खालील शिक्षणक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संरचित करण्यात आलेली आहेत. सदर शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून सुरू करण्यासाठी मान्यता मिळावी, यास्तव सादर.)<br>1) M.Sc. Environmental Science 6) M.A. Education<br>2) B.Com. 7) B.C.A.<br>3) M. Com. 8) B.Sc. (MGA)<br>4) M.B.A. 9) B.A.Yoga<br>5) M.A. History<br>**नियोजन मंडळ ठराव :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संरचित करण्यात आलेले सर्व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली व सदर ठराव विद्वत परिषदेत मान्यतेस्तव सादर करण्याचे ठरले. तसेच वेळोवेळी NEP2020 संदर्भात UGC/DEB/State Government यांचेकडून जे निर्देश प्राप्त होतील त्यानुसार कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले |
| | 44.3.11<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे एन.सी.टी.ई. ला एकात्मिक शिक्षणक्रम (बी.ए.बी.एड, बी.एस्सी. बी.एड., बी.कॉम. बी.एड) य.च.म.मुक्त विद्यापीठात IGNOU च्या धर्तीवर नियमित पध्दतीने सुरू करण्यास मान्यता मिळणेबाबत.**<br>**(टिपणी** - एन.सी.टी.ई. ने मान्यता दिल्यास सदर तिन्ही शिक्षणक्रम विद्याशाखेत नियमित पध्दतीने कार्यान्वित केले जातील. सदर शिक्षणक्रम सुरू करण्यास विद्यापीठाची मान्यता असावी यासाठी एन.सी.टी.ई. ला पाठविलेला प्रस्ताव नियोजन मंडळापुढे मान्येस्तव सादर.)<br>**नियोजन मंडळ ठराव :** IGNOU च्या धर्तीवर नियमित पध्दतीने एन.सी.टी.ई. ला प्रस्तावित एकात्मिक शिक्षणक्रम (बी.ए.बी.एड, बी.एस्सी. बी.एड., बी.कॉम. बी.एड) सुरू करण्याची शिफारस करण्यात आली. सदर शिफारस मंजूरीसाठी विद्वत परिषदेत सादर करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 44.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 44.4.1 | **विज्ञान विद्याशाखेचा M.Sc. – Environment Science – 2 Years Duration चा शिक्षणक्रम सन 2023-24 पासून सुरू करण्यास मान्यता मिळणेबाबत...**<br>**(टिपणी** – विज्ञान विद्याशाखेने 2022-23 पासून 2022 च्या Pattern नूसार M.Sc. (Physics), (Chemistry), (Zoology), (Botany) हे शिक्षणक्रम सुरू करण्यात आले असून त्यांच्या द्वितीय वर्षाचे अध्ययन साहित्य विकसनाचे काम सुरू आहे. NEP2020 नुसार 2023 पासून नव्याने संरचना करून M.Sc. – Environment Science – 2 Years Duration हा शिक्षणक्रम सुरू ठेवण्यास मान्यता मिळणेबाबत...)<br>**नियोजन मंडळ ठराव :** NEP2020 नुसार 2023 पासून नव्याने संरचना करून M.Sc. – Environment Science – 2 Years Duration हा शिक्षणक्रम सुरू ठेवण्यास सर्वानुमते शिफारस करण्यात आली. सदर शिफारस विद्वत परिषदेत सादर करण्यास मान्यता देण्यात आली. |

**सदस्य सचिव**
**नियोजन मंडळ**

**अध्यक्ष**
**नियोजन मंडळ**